# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः30.05.2026** **वारः शनिवार**

---

1. बीएसएफच्या साठाव्या स्थापना वर्षात सीमा सुरक्षेबाबतच्या संकल्पना पूर्णपणे बदलण्याचा सरकारचा निर्णय – गृहमंत्री अमित शहा यांचं प्रतिपादन
2. नेत्रसेमी या सेमीकंडक्टर स्टार्टअपनं विकसित केली देशातली पहिल्या पिढीची एआय सिस्टम-ऑन-चिप
3. राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीच्या 150 व्या तुकडीचं आज दीक्षांत संचलन
4. पुण्यातील विषारी दारु प्रकरणातील मृतांची संख्या वाढण्याची शक्यता आणि
5. आयपीएल क्रिकेट मध्ये राजस्थान रॉयल्सचा पराभव करून गुजरात टायटन्स अंतिम फेरीत

**अमित शहा-भूज**

सीमा सुरक्षा दलाला अर्थात बीएसएफला भविष्यातील आव्हानांचा सामना करण्यासाठी सक्षम करण्याच्या उद्देशानं त्यांच्यावर आणखी काही क्षेत्रातील जबाबदारी सोपवण्याचा सरकार विचार करत आहे अशी माहिती केंद्रिय गृहमंत्री अमित शहा यांनी दिली. ते काल गुजरातमध्ये भूज इथं बीएसएफच्या जवानांशी बोलत होते. भारत पाकिस्तान सीमेवरच्या धोरणात्मकदृष्ट्या महत्त्वाच्या दोन नवीन तळांचं उद्घाटन शहा यांच्या हस्ते यावेळी करण्यात आलं. बीएसएफच्या साठाव्या स्थापना वर्षात सीमा सुरक्षेबाबतच्या संकल्पना पूर्णपणे बदलण्याचा निर्णय सरकारनं घेतल्याचं ते म्हणाले. स्मार्ट बॉर्डर सिक्युरिटी प्रकल्पाअंतर्गत सीमेलगत सुरक्षा जाळं उभारण्याचे प्रयत्न सुरू आहेत. रडार, ड्रोन, निरीक्षण टॉवर्स, अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि सुरक्षा सैनिक यांच्या समन्वयातून भक्कम सुरक्षा जाळं तयार होईल असा विश्वास केंद्रिय गृहमंत्र्यांनी व्यक्त केला. पश्चिम बंगालच्या सीमेलगत कुंपण घालण्याचं काम दीर्घकाळ रेंगाळलेलं होतं. त्यातील अडथळा आता नव्या सरकारच्या स्थापनेनंतर दूर झाला आहे. एका आठवड्यातच नव्या सरकारनं सीमेवर कुंपण घालण्यासाठी जमीन उपलब्ध करुन दिली असं शहा यांनी सांगितलं.

**वैष्णव**

DLI अर्थात डिझाइन लिंक्ड इन्सेंटिव्ह योजना उत्साहवर्धक परिणाम देत असल्याचं केंद्रीय इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी म्हटलं आहे. तिरुवनंतपुरम इथल्या नेत्रसेमी या सेमीकंडक्टर स्टार्टअपनं प्रगत 12-नॅनोमीटर टेक्नॉलॉजी नोडचा वापर करून नेत्रा A2000 ही देशातली पहिल्या पिढीची एआय सिस्टम-ऑन-चिप, विकसित केली आहे, असं समाज माध्यमावरील एका पोस्टमध्ये वैष्णव म्हणाले. ही चिप व्यावसायिक स्तरावर वापरली जाईल, तेव्हा ती निगराणी, ऑटोमोबाईल, रोबोटिक्स आणि ड्रोन यांसारख्या क्षेत्रांमधील स्मार्ट व्हिजन ॲप्लिकेशन्सना बळ देईल, असं ते म्हणाले.

**NDA**

राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी म्हणजे एनडीएच्या दीडशेव्या तुकडीचं दिमाखदार दीक्षांत संचलन आज पुण्यात प्रबोधिनीच्या खेत्रपाल मैदानावर पार पडलं. लष्करप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी यांनी संचलनाची मानवंदना स्वीकारली. भारतीय हवाई दलाच्या नेत्रदीपक हवाई कसरती हे या सोहळ्याचं प्रमुख आकर्षण होतं. दरम्यान एनडीएचा दीक्षांत समारंभ काल हबीबुल्ला सभागृहात दिमाखदार वातावरणात पार पडला. निवृत्त आयपीएस अधिकारी डॉ. किरण बेदी या

समारंभाच्या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. यावेळी 236 कॅडेट्सना जवाहरलाल नेहरू विद्यापीठाची पदवी प्रदान करण्यात आली. बदलत्या जागतिक सुरक्षा परिस्थितीत 'स्कॉलर वॉरियर्स' म्हणून नेतृत्व करण्याचं आवाहन किरण बेदी यांनी कॅडेट्सना केलं. समारंभात एनडीएचे प्रभारी प्राचार्य डॉ. विनय दीप यांनी शैक्षणिक अहवाल सादर केला.

**प्रधान**

केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी समग्र शिक्षा अभियानांतर्गत निधी वितरण आणि विनियोगाचा सविस्तर आढावा घेतला. 'समग्र शिक्षा'च्या तिसऱ्या आवृत्तीला अधिक कार्यक्षम, पारदर्शक आणि परिणाम-केंद्रित बनवण्यावर लक्ष केंद्रित करण्यात आलं आहे. या वर्षापासून समग्र शिक्षा अभियान, प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण आणि इतर प्रमुख योजनांच्या एकत्रीकरणाद्वारे एकात्मिक दृष्टिकोन अवलंबला जाईल, असं सांगून, यामुळं शालेय शिक्षण प्रणालीमध्ये अधिक समन्वय आणि परिणाम सुनिश्चित होईल, असं समाज माध्यमावरील एका पोस्टमध्ये प्रधान म्हणाले. केंद्र आणि राज्य संबंध अधिक दृढ करण्यावरही कालच्या बैठकीत चर्चा झाली. राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 च्या प्रभावी अंमलबजावणीवर नव्यानं लक्ष केंद्रित केलं जाईल असं सांगून या अंतर्गत विद्यार्थ्यांमध्ये नवनिर्मिती, पोषण, कौशल्य विकास, क्रीडा आणि कला यांवर विशेष भर दिला जाईल, असं प्रधान यांनी सांगितलं. हे प्रयत्न सक्षम विद्यार्थ्यांचे संगोपन करण्यात आणि विकसित भारत 2047 साठी आवश्यक मनुष्यबळ उभारण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावतील, असंही ते पुढं म्हणाले.

**बँक-आढावा**

आर्थिक वर्ष 2025-26 मधील सार्वजनिक क्षेत्रातील बँकांच्या कार्यान्वयन, वित्तीय आणि धोरणात्मक प्राधान्यांबाबतच्या कामगिरीचा तसंच प्रगतीचा आढावा घेण्यासाठी काल नवी दिल्लीत एक बैठक घेण्यात आली. वित्त विभागाचे सचिव एम. नागाराजू या बैठकीच्या अध्यक्षस्थानी होते. सार्वजनिक बँकांमध्ये गतीशील तक्रार निवारण यंत्रणा, सशक्त प्रशासकीय मानकं आणि कामकाजातील तत्परता महत्त्वाची असल्याचं नागाराजू यावेळी म्हणाले. व्यवसाय विकास, नफा, मालमत्ता दर्जा, सरकारी योजनांची अंमलबजावणी, वित्तीय समावेशन, डिजिटल परिसंस्था, सूक्ष्म लघु मध्यम उद्योगांना पतपुरवठा, सायबर सुरक्षा आणि कामकाजातील जोखीम व्यवस्थापनाचा या बैठकीत आढावा घेण्यात आल्याची माहिती अर्थ मंत्रालयानं बैठकीनंतर दिली. या बैठकीत वित्तीय सेवा विभागाच्या सुधारित संकेतस्थळाचा प्रारंभ करण्यात आला.

**कॉमन लँडिंग पोर्टल**

वित्तीय सेवा विभागानं दावा न केलेल्या वित्तीय मालमत्तेविषयी माहिती अधिक सुलभतेनं उपलब्ध करून देण्यासाठी कॉमन लँडिंग पोर्टल सुरू केलं आहे. हे पोर्टल देशातील 12 सार्वजनिक बँकांनी संयुक्तपणे स्थापन केलेल्या PSBA अर्थात पब्लिक सेक्टर बँक अलायन्स' या संघटनेच्या सहकार्यानं विकसित करण्यात आलं आहे. www.unclaimedassetsportal.in हे पोर्टल संपूर्ण वित्तीय परिसंस्थेतील दावा न केलेल्या बँक ठेवी, विमा दावे, समभाग, लाभांश आणि म्युच्युअल फंडांसाठी शोध सुविधा उपलब्ध करून देणारं एक एकीकृत व्यासपीठ म्हणून काम करतं, असं अर्थ मंत्रालयानं सांगितलं. हे पोर्टल एकाच व्यासपीठावर अनेक शोध सुविधा एकत्र आणून नागरिकांना त्यांच्या हक्काच्या वित्तीय मालमत्तेशी पुन्हा जोडण्याच्या सुरू असलेल्या प्रयत्नांना बळकटी देईल, असं वित्तीय सेवा विभागाचे सचिव, एम. नागाराजू यांनी अधोरेखित केलं.

**यूक्रेन-रशिया**

यूक्रेनमधील संघर्षाच्या समाप्तीसाठी विशिष्ट कालमर्यादा देणं अशक्य आहे असं रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांनी पत्रकारांच्या प्रश्नांना उत्तर देताना सांगितलं. युद्धभूमीवरील परिस्थिती पाहता हा संघर्ष संपुष्टात येण्याच्या मार्गावर असल्याचं त्यांनी म्हटलं आहे. रशिया वाटाघाटी सुरू ठेवण्यास तयार असून चर्चेला कधीच नकार दिला

नसल्याचं सांगून संबंधितांशी संपर्क ठेवला असला तरीही अद्याप औपचारिक वाटाघाटी करण्यायोग्य स्थिति नसल्याचं ते म्हणाले. रशियाला थेट लष्करी धोका निर्माण करणारी सर्व ठिकाणे लष्करी लक्ष्य आहेत, असं पुतीन यांनी सांगितलं. NATO अर्थात उत्तर अटलांटिक करार संघटनेनं पूर्वेकडे एकही पाऊल टाकणार नाही असं सांगून रशियाची फसवणूक केली असल्याचा दावा त्यांनी केला. दरम्यान, युक्रेनमधील संघर्ष सोडवण्याबाबत युरोपीय देशांचे प्रतिनिधी आज लंडनमध्ये अनौपचारिक चर्चा करत असल्याचं एका राजनैतिक सूत्राचा हवाला देत रशियच्या अधिकृत माध्यमांनी म्हटले आहे.

**<u>हवा गुणवत्ता</u>**

एनसीआर अर्थात राष्ट्रीय राजधानी क्षेत्र आणि लगतच्या परिसरातील हवा गुणवत्ता व्यवस्थापन आयोगानं संपूर्ण एनसीआर क्षेत्रात श्रेणीबद्ध प्रतिसाद कृती योजनेच्या विद्यमान वेळापत्रकाच्या पहिल्या टप्प्याअंतर्गत सर्व कार्यवाही तात्काळ प्रभावानं रद्द केली आहे. या भागातील हवेच्या गुणवत्तेत लक्षणीय सुधारणा झाल्यामुळं हा निर्णय घेण्यात आला आहे. दिल्लीचा हवा गुणवत्ता निर्देशांक या महिन्याच्या 28 तारखेला 207 वरून काल 123 पर्यंत सुधारला. भारतीय हवामान विभागाच्या अंदाजानुसार, येत्या काही दिवसांत हवा गुणवत्ता निर्देशांक 'मध्यम' श्रेणीत राहण्याची शक्यता आहे.

**<u>विषारी दारू</u>**

पुण्यातील विषारी दारु प्रकरणातील मृतांची संख्या वाढण्याची शक्यता आहे. फुगेवाडीतील काहीजण ही दारु प्यायल्यामुळं अत्यवस्थ असल्याचं समजतं. मृतांची आतापर्यंत नेमकी संख्या किती झाली आहे ते मात्र अधिकृतपणे समजू शकलेलं नाही. या प्रकरणी पुणे आणि पिंपरी-चिंचवड पोलीस वेगानं तपास करत आहेत, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल मुंबईत वार्ताहरांशी बोलताना सांगितलं. या प्रकरणातील मुख्य आरोपी योगेश वानखेडे याच्यासह 8 जणांना अटक करण्यात आली आहे. वानखेडे याच्यावर यापूर्वीही अनेक गुन्हे दाखल असल्याचं समजतं. या प्रकरणाच्या मुळाशी जाऊन सखोल चौकशी करण्याचे आदेश उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी प्रशासनाला दिले आहेत.

**<u>आयपीए</u>**

आयपीएल क्रिकेटमध्ये, काल रात्री न्यू चंदीगड इथं झालेल्या दुसऱ्या पात्रता सामन्यात गुजरात टायटन्सनं राजस्थान रॉयल्सचा 7 गडी राखून पराभव केला. नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना, वैभव सूर्यवंशीच्या 96 आणि रवींद्र जडेजाच्या नाबाद 45 धावांच्या जोरावर राजस्थान रॉयल्सनं निर्धारित 20 षटकांत सहा गडी गमावून 214 धावा केल्या. गुजरात टायटन्सनं 8 चेंडू शिल्लक असताना तीन गडी गमावत 219 धावा करून हे आव्हान पार केलं. साई सुदर्शननं 58 तर कर्णधार शुभमन गिलनं 53 चेंडूंत 104 धावा केल्या. गुजरात टायटन्सकडून कागिसो रबाडा आणि जेसन होल्डर यांनी प्रत्येकी दोन बळी घेतले. शुभमन गिलला सामनावीर म्हणून गौरविण्यात आलं. अंतिम फेरीत गुजरात टायटन्सचा सामना रविवारी अहमदाबाद इथं गतविजेत्या रॉयल चॅलेंजर्स बंगळूरूशी होईल.

## या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.

## नमस्कार.